INTERNATIONAL JOURNAL OF ECONOMIC SOCIAL SCIENCE AND MANAGEMENT LAW
Peer Reviewed, Referred & Indexed Journal
E-ISSN: 3070-0558
VOL.7, NO.1(1) (2026)

# युवकांमधील विचलनाची उपसंस्कृती: एक समाजशास्त्रीय अध्ययन

**डॉ. विनोद श्रावण शेंडे,** समाजशास्त्र विभाग प्रमुख,
हजरत बाबा ताजुद्दीन कला-वाणिज्य महाविद्यालय, नागपूर
Email: vinod140273@gmail.com

**गोषवारा*(Abstract)*:**

*प्रस्तुत शोधनिबंध आधुनिक समाजातील युवकांमध्ये विकसित होणाऱ्या 'विचलनाच्या उपसंस्कृती'चा चिकित्सक अभ्यास करण्यात आला आहे. 'विचलन' म्हणजे प्रस्थापित सामाजिक नियमांचे उल्लंघन करणे. जेव्हा युवकांचा एखादा गट मुख्य प्रवाहातील मूल्यांना नाकारून स्वतःची स्वतंत्र, अनेकदा नकारात्मक मूल्ये विकसित करतो, तेव्हा त्याला 'विचलनाची उपसंस्कृती' (Subculture of Delinquency) म्हटले जाते. या अध्ययनात विचलनामागची सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक, समवयस्क गटांच्या प्रभावाचे विश्लेषण करण्यात आले आहे. तांत्रिक आणि मानसिक कारणे शोधण्यात आली आहेत. संशोधनातून असे दिसून येते की, बेरोजगारी, पालकांशी तुटलेला संवाद आणि सोशल मीडियाचा अनियंत्रित प्रभाव यामुळे युव , अंमली पदार्थ, टोळीयुद्धे आणि सायबर गुन्ह्यांकडे वळत आहेत. विचलनाची उपसंस्कृती ही समजशास्त्रातील एक प्रमुख संकल्पना आहे, जी मुख्य संस्कृतीतील स्वीकृत मूल्ये आणि मापदंडाचा तिरस्कार करणाऱ्या उप समूहाच्या संस्कृतीला संदर्भित करते. जी अल्बर्ट कोहेन यांच्या "Delinquent Boys: The Culture of the Gang" मधून उदयास आली. कोहेन यांच्या सिद्धांतानुसार, निम्नवर्गीय तरुण मुलांमध्ये मुख्य मध्यमवर्गीय तरुण मुलांमध्ये मुख्य मध्यमवर्गीय मूल्ये जसे शैक्षणिक यश, महत्वाकांक्षा प्राप्त करण्यात अपयश आल्यास, ते वैकल्पिक उपसंस्कृती विकसित करतात. जी मुख्य संस्कृतीच्या विरुद्ध मूल्ये जसे की हिंसा, गुंडागर्दी, क्षणिक आनंद इत्यादी बाबींना प्राधान्य देते.*

*संशोधनात प्रामुख्याने अल्बर्ट कोहेन यांचा 'उपसंस्कृती सिद्धांत' आणि रॉबर्ट मर्टन यांचा 'साध्य-साधन विसंगती सिद्धांत याचा आधार घेण्यात आला आहे. मध्यमवर्गीय मूल्यांशी जुळवून घेण्यास अपयशी ठरलेले युवक स्वतःची एक स्वतंत्र मूल्यव्यवस्था निर्माण करतात, ज्याला 'उपसंस्कृती' म्हटले जाते. या प्रक्रियेत झपाट्याने होणारे शहरीकरण, सोशल मिडियाचा अतिवापर, बेरोजगारी, विभक्त कुटुंब पद्धती आणि व्यसनाधीनता हे घटक महत्वपूर्ण भूमिका पार पाडतात. सदर अध्ययनासाठी विचलनाच्या विविध प्रकारांचे, जसे की सायबर गुन्हेगार, अंमली पदार्थांचे सेवन आणि आक्रमकता, यांचे निरीक्षण करण्यात आले आहे. निष्कर्षावरून असे दिसून येते की, जेव्हा समाजातील मुख्य प्रवाहाकडून युवकांच्या आकांक्षा पूर्ण होत नाहीत, तेव्हा ते विचलनाचा मार्ग स्वीकारतात. शेवट, या समस्येवर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रभावी समुपदेशन, रोजगाराच्या संधी आणि नैतिक शिक्षणाची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन केले आहे.*

***मुख्य शब्द:*** *विचलन, उपसंस्कृती, समवयस्क गट, असंगती, सामाजिक नियंत्रण, नागरीकरण*

## प्रस्तावना (Introduction):

कोणत्याही राष्ट्राची प्रगती त्या देशातील तरुण पिढीवर अवलंबून असते. युवक ही एक अत्यंत संवेदनशील आणि ऊर्जावान शक्ती आहे. मात्र, जागतिकीकरण आणि शहरीकरणाच्या वेगवान प्रक्रियेत तरुण पिढीमध्ये मोठ्या प्रमाणात संक्रमण होत आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून समाजाची काही विशिष्ट मानके (Norms) असतात. जेव्हा व्यक्ती या मानकांचे उल्लंघन करते, तेव्हा त्याला 'विचलित वर्तन' असे म्हणतात. युवक ही देशाची संपत्ती आहे, परंतु जागतिकीकरण आणि शहरीकरणामुळे युवकांच्या वर्तनात आमूलाग्र बदल झाले आहेत. जेव्हा युवक प्रस्थापित सामाजिक नियम आणि कायद्यांचे उल्लंघन करतात, तेव्हा त्याला 'विचलन' म्हणतात. अल्बर्ट कोहेन यांच्या १९५५ मध्ये प्रकाशित केलेल्या पुस्तकात "Delinquent Boys: The Culture of the Gang" मध्ये ही उपसंस्कृती मध्यमवर्गीय मूल्यांचा प्रतिकार म्हणून उदयास येते. शालेय अपयश आणि सामाजिक दर्जाच्या अभावामुळे तरुण गँग अथवा समूह तयार करतात, ज्यातून मुख्य संस्कृतीच्या उलट मूल्ये विकसित होतात जसे की हिंसा, चोरी किंवा बंडखोर. ही उपसंस्कृती तरूणांना पर्यायी आणि ओळख करून देते.

वर्ल्ड ड्रग रिपोर्टने २०२२ मध्ये केलेल्या सर्वेक्षणावरून २८४ दशलक्ष व्यक्ती ड्रग्सचा दुरुपयोग करीत असल्याचे आढळून आले. भारतात दारू, अफू, भांग, गांजा याचा वापर करणारे १५ ते ३५ वयोगटातील असून ते त्याच्या आहारी गेलेले अनेक बेरोजगार आहेत. अलीकडे गुन्हेगारी वाढण्याचे मुख्य कारण दारू व अंमली पदार्थांच्या दुरुपयोगाचे व्यसनी व्यक्ती हे सर्वाधिक आहे. दिल्ली शहरातील २०२१ ला केलेल्या सर्वेक्षणावरून ३२८७ गुन्हेगारांपैकी असे लक्षात आले की, १३८७ मुले असे आहेत की ते फक्त दहावीपर्यंत शिक्षण पूर्ण केले नाही. साधारणत: अल्पवयीन मुलांवर ४४ प्रतिशत गुन्ह्याची नोंद केली असून त्याचे प्रमाण दरवर्षी वाढत चालले आहे. अशा प्रकारच्या महानगरात घडणाऱ्या घटना अत्यंत धोक्याची घन्टा असून त्या दृष्टिकोनातून या ज्वलंत समस्यांचा अभ्यास करण्यात आला आहे. आपल्या देशाचा जो आधारस्तंभ आहे तो म्हणजे विद्यार्थी अथवा युवक, यांनी आपण ठरलेल्या सकारात्मक ध्येयापासून विचलित होऊ नये. जेणेकरून स्वत:ची व तद्वतच समाजाची उन्नती होण्यास सहाय्यक ठरू शकेल.

## संशोधनाचे उद्देश:

१ युवकांमधील विचलनाच्या उपसंस्कृतीची कारणे शोधणे.
२. विचलनाचा युवकांच्या मानसिक आणि सामाजिक जीवनावर होणारा परिणाम अभ्यासणे.
३. विचलनाची समस्या रोखण्यासाठी समाजशास्त्रीय उपाययोजना सुचवणे.

## गृहीतकृत्ये (Hypotheses)

**१.** विभक्त कुटुंब पद्धती आणि पालकांचे दुर्लक्ष यामुळे युवकांमध्ये विचलनाचे प्रमाण वाढते.
२. बेरोजगारी आणि आर्थिक हतबलता युवकांना गुन्हेगारीकडे वळवते.
३. समवयस्क गटाचा प्रभाव विचलनाची उपसंस्कृती निर्माण करण्यात महत्वाची भूमिका बजावतो.

## संशोधन पद्धती (Research Methodology):-

युवकांमधील विचलनाची उपसंस्कृती या संशोधन पेपर विषयाच्या संदर्भात अभ्यास करण्यासाठी वर्णनात्मक आणि निदानात्मक आराखडा तयार करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे तथ्य संकलन करण्यासाठी दुय्यम स्त्रोतांमध्ये संदर्भ ग्रंथ, जर्नल्स, संशोधन अहवाल, शासकीय अहवाल, इंटरनेट, मासिके, वर्तमानपत्रे, इत्यादी साधनांचा वापर करण्यात आले आहे.

**साहित्याचा आढावा (Review of Literature):**

प्रस्तुत संशोधन विषयाचे उद्देश साध्य करण्यासाठी पूर्व साहित्याचा आढावा घेण्यात आला आहे. विचलनाच्या अभ्यासात अनेक समाजशास्त्रज्ञांनी मोलाची भूमिका पार पाडली आहे.

अल्बर्ट कोहेन (Delinquent Boys), त्यांनी 'स्टेटस फ्रस्ट्रेशन' (Status Frustration) ही संकल्पना मांडली. कनिष्ठ वर्गातील तरुण मध्यमवर्गीयांच्या दर्जाशी स्पर्धा करू शकत नाहीत, तेव्हा ते विचलित उपसंस्कृती तयार करतात. हॉवर्ड बेकर (Labeling Theory), समाजाने एखाद्याला 'विचलित' ठरवले की तो व्यक्ती कायमचा विचलित वर्तनाकडे वळतो. रिचर्ड क्लॉवर्ड आणि ओहलिन, यांनी संधीच्या विषमतेतून निर्माण होणाऱ्या गुन्हेगारी उपसंस्कृतीचा अभ्यास केला आहे. एस. सी. दुबे यांनी, “The Restive Student Stand and Themes in Contemporary Youth Culture” या विषयावरील भारतातील युवकांच्या संदर्भात चार उपसंस्कृतीचे विश्लेषण करण्यात आले आहे. १. हीप्पीचे भारतीय समकक्ष. २.पाश्चात्य आणि परके कुटुंबात आलेले मॉडेल. ३. समाजातील मध्यम ते निम्न विशेषाधिकार प्राप्त स्थितीतील युवक, ४. सर्वात मोठ्या गटात साक्षरांची पहिली पिढी आहे आणि ज्यांचे पालक आहेत उच्च शिक्षणाचे फायदे मिळाले नाहीत.

**समाजशास्त्रीय दृष्टिकोन (Sociological Perspectives)**

युवकांमधील विचलन समजून घेण्यासाठी खालील महत्त्वाचे सिद्धांत आधारभूत ठरतात.

**अ) रॉबर्ट मर्टन यांचा 'ताण-तणाव सिद्धांत' (Strain Theory):** मर्टन यांच्या मते, समाज यशाची काही ध्येये उदा. पैसा, प्रतिष्ठा निश्चित करतो. जेव्हा ही ध्येये गाठण्यासाठी कायदेशीर मार्ग, शिक्षण, नोकरी उपलब्ध नसतात, तेव्हा तरुण 'अनुकूलन' (Innovation) म्हणून चुकीच्या मार्गाचा अवलंब करतात.

**ब) अल्बर्ट कोहेन यांचा 'उपसंस्कृती सिद्धांत' (Subcultural Theory):** कोहेन यांनी विशेषतः 'गल्लीतील मुलांच्या' (Gang behavior) अभ्यासावर भर दिला. त्यांच्या मते, जेव्हा खालच्या वर्गातील मुलांना मध्यमवर्गीयांच्या जगात स्थान मिळत नाही, तेव्हा ते स्वतःची एक वेगळी संस्कृती निर्माण करतात जिथे 'वाईट वागणे' हेच 'सन्मानाचे' लक्षण मानले जाते.

**क) लेबलिंग थिअरी (Labeling Theory):** एडवर्ड लेमर्ट यांनी गुन्हेगारी अथवा विपथगामी वर्तन स्पष्ट करण्यासाठी लेबलिंग सिद्धान्त वापरला आहे, ही एक समाजशास्त्रीय संकल्पना आहे. जी विशिष्ट आधारे समाजात लोकांना कसे लेबल अथवा कलंकित केले जाते. हावर्ड बेकर यांनी असे स्पष्ट केले की, समाजाने एखाद्या तरुणाला 'गुन्हेगार' किंवा 'बेजबाबदार' असा शिक्का (Label) मारला, तर तो तरुण त्या शिक्क्यालाच आपली खरी ओळख मानू लागतो आणि अधिक मोठ्या प्रमाणावर विचलन करतो.

**ड) विभेदक-साहचर्यदर्शक सिद्धांत (Differential Association Theory):** विभेदक संपर्क हा सिद्धांत विचलनाच्या संदर्भात सदरलँड यांनी सांगितले की विचलित वर्तन ही अनुवंशाने संक्रमित होत नाही तर शिकावी लागते. गुन्हेगारी प्रवृत्ती असणाऱ्या समूहाशी मुलांचा सहवास वाढला तर विचलित वर्तनाचा नकळतपणे स्वीकार केला जातो. अशाप्रकारे वाईट संगतीमुळे युवक विचलनाचे वर्तन शिकतात.

**विचलनाचा अर्थ:**

विचलनाचा अर्थ समजून घेतांना अनेक विचारवंतांचा संदर्भ घेणे आवश्यक आहे. **हेरी जॉन्सन**, " विचलित वर्तन म्हणजे फक्त प्रमाणकांचा भंग करणारे वर्तन नव्हे तर ते अशा प्रकारचे वर्तन असते की, त्यामुळे प्रमाणकांशी अभिमुख असलेला कर्ता प्रमाणकांचा जाणूनबुजून भंग करतो एकप्रकारे ते उद्देशपूर्ण उल्लंघन असते."

**एलिस व लिपेटस** : "समाजाने संमत केलेल्या प्रमाणकांपेक्षा वेगळे आचरण म्हणजे विचलित वर्तन होय."

**विलियम जे गुड**: "समुह सदस्यांनी आपल्या समूहातील प्रमाणकांचा भंग करणारी क्रिया म्हणून निर्देश केला आहे, अशी कोणतीही क्रिया किंवा विधान म्हणजे विचलित वर्तन होय."

वरील समाजशास्त्रज्ञांनी केलेल्या व्याख्याचा आढावा घेतल्यानंतर असे आढळून येते की, जर व्यक्ति जाणीवपूर्वक समाजमान्य प्रमाणकांविरुद्ध वर्तन करतात तेव्हा त्या वर्तनाला विचलित वर्तन असे म्हटले जाते.

**उपसंस्कृती (Subculture) म्हणजे काय?**

मानवाने जीवन जगण्यासाठी विशिष्ट प्रकारच्या पद्धती वापर तयार करून त्याची अंमलबजावणी करतात अथवा त्यानुसार चालतात त्यालाच संस्कृती असे म्हटले जाते. पुढे आपल्या सोईनुसार मूळ संस्कृतीला बाजूला ठेवून विशेष प्रकारचा वेगळा समुह तयार केला जातो त्याला उपसंस्कृती असे म्हणतात. मुख्य संस्कृतीमध्ये राहूनही जेव्हा एखादा विशिष्ट गट उदा. गुन्हेगारी टोळया, ड्रग्ज घेणारे गट स्वतःचे वेगळे नियम, भाषा आणि राहणीमान तयार करतो, त्याला उपसंस्कृती म्हणतात. युवकांमधील ही उपसंस्कृती अनेकदा 'बंडखोरी' (Rebellion) म्हणून उदयाला येते.

जेव्हा समाजातील एक छोटा गट मुख्य संस्कृतीच्या चौकटीबाहेर जाऊन स्वतःची वेगळी जीवनशैली, भाषा आणि वर्तनपद्धती विकसित करतो, तेव्हा त्याला 'उपसंस्कृती' म्हणतात. या समुहामध्ये आपली वेगळी विचारसरणी, खानपान, केशरचना, पोशाख, बोलीभाषा, अशा प्रकारची त्यांची विशेषत: असते. जसे की, महाविद्यालयीन संस्कृती, नवयुवकांची संस्कृती, हिप्पी संस्कृती इ. प्रकारचे उदाहरणे देता येईल.

युवा पिढी उपसंस्कृतीचे वाहक बनून समाजात विचलनाच्या नव्या प्रवृत्तींना निर्माण करतात. युवकांमध्ये पाश्चत्य देशात निर्माण होणाऱ्या घटनांचा परिणाम सगळीकडे होतो. आपल्या देशात देखील उपसंस्कृतीच्या माध्यमातून तरूणांमध्ये बदल झालेले दिसतात. एक नवीन समूह तयार केला जातो ते इतरांचे अनुकरण करून समाजविरोधी कार्य केले जाते.

उपसंस्कृतीच्या संदर्भात समाजशास्त्रज्ञानी व्याख्या केल्या आहेत.

१. अल्बर्ट कोहेन, "अशी संस्कृती जी समाजात प्रस्थापित असलेल्या मूल्यांच्या विरुद्ध प्रतिक्रिया म्हणून निर्माण होते."

२. जे. मिल्टन यिंगर, "जेव्हा एखादा गट मुख्य समाजाच्या मूल्यांना विरोध दर्शवण्यासाठी आपली स्वतंत्र मूल्ये तयार करतो, तेव्हा त्याला प्रति-संस्कृती किंवा उपसंस्कृती म्हणतात."

INTERNATIONAL JOURNAL OF ECONOMIC SOCIAL SCIENCE AND MANAGEMENT LAW
Peer Reviewed, Referred & Indexed Journal
E-ISSN: 3070-0558
VOL.7, NO.1(1) (2026)

**विचलनाची प्रमुख कारणे:**

व्यक्ति विचलित वर्तन का करतात? या समाजातील प्रस्थापित असलेल्या व्यवस्थेचा अभ्यास केल्यानंतर त्याची कारणे पुढीलप्रमाणे आढळून आली आहेत. जसे समाजातील कुटूंब, शेजार, शिक्षण संस्था, समवयस्क समूहाच्या माध्यमातून व्यक्तीचे दोषपूर्ण आणि अपर्याप्त सामाजीकरण करणे, वाईट प्रभावी मान्यता देणे, कमकुवत अंमलबजावणी, सोयीचे संयुक्तीकरण, प्रमाणकांच्या भंगाबाबत गुप्तता ठेवणे, भ्रष्ट अंमलबजावणी करणे, गुन्हा पिडीतांचे सहकार्य केल्यामुळे, विचलित समूहाप्रती भावनात्मक निष्ठा ठेवणे, उपसंस्कृतीद्वारा विचलनाचे समर्थन करणे. इत्यादी प्रकारच्या कारणामुळे समाजातील व्यक्तीमध्ये विचलित वर्तन निर्माण झाल्याचे निदर्शनात येते.

१ **कौटुंबिक विघटन (Family Disorganization):** विभक्त कुटुंबे, पालकांमधील सततचे होणारे वाद किंवा पालकांचे मुलांकडे होणारे दुर्लक्ष यामुळे मुलांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होते. ही मुले बाहेर आधार शोधू लागतात. प्रेमाच्या कतरतेमुळे मुले विचलित समूहाकडे आकर्षिले जातात आणि अनेकदा चुकीच्या संगतीला लागतात.

२ **समवयस्काच्या गटांचा दबाव (Peer Groups):** विशिष्ट वयात असणाऱ्या मुलांमध्ये विचलित वर्तन करण्याचे मुख्य कारण म्हणजे 'पियर प्रेशर' हे सर्वात मोठे आहे. आपल्या मित्रांच्या समूहात स्वीकारले जाण्यासाठी अनेकदा युवक अंमली पदार्थ, चोरी अथवा हिंसेचा मार्ग स्वीकारतात.

३ **बेरोजगारी आणि आर्थिक विषमता:** शिक्षण असूनही नोकरी न मिळणे किंवा आर्थिक गरजा पूर्ण न होणे यामुळे तरुण 'शॉर्टकट' मार्गाने पैसे कमवण्यासाठी विचलनाकडे वळतात.

४ **प्रसारमाध्यमे आणि सोशल मीडिया:** चित्रपटांमधील हिंसेचे उदात्तीकरण आणि सोशल मीडियावरील 'लाईक्स' मिळवण्यासाठी केले जाणारे स्टंट्स उदा. धोकादायक रील बनवणे ही नवीन प्रकारची विचलित उपसंस्कृती आहे.

**विचलनाचे परिणाम:**विचलनाच्या कारणांचा आढावा घेतल्यानंतर या उपसंस्कृतीचा व्यक्ती, कुटुंब आणि समाजावर कसा परिणाम होतो या संदर्भात खलीलप्रमाणे विश्लेषण केले आहे.

**अ) वैयक्तिक परिणाम:** भविष्याचा नाश: गुन्हेगारी नोंदीमुळे करिअरच्या संधी नष्ट होतात.
आरोग्याच्या समस्या: व्यसनाधीनतेमुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्य बिघडते.

**ब) कौटुंबिक परिणाम:** कुटुंबाची सामाजिक प्रतिष्ठा कमी होते. पालकांवरील मानसिक आणि आर्थिक ताण वाढतो, ज्यामुळे कौटुंबिक स्वास्थ्य बिघडते.

**क) सामाजिक परिणाम:** गन्हेगारीत वाढ: समाजात असुरक्षिततेचे वातावरण निर्माण होते.
मानव संसाधन हानी: राष्ट्राच्या विकासात योगदान देणारी तरुण शक्ती विघातक कामात खर्च होते.
सामाजिक अस्थिरता: विचलनाची उपसंस्कृती प्रस्थापित नैतिक मूल्याना आव्हान देते, ज्यामुळे सामाजिक वीण सैल होते.

**निष्कर्ष (Conclusion):**

१. **ओळखीचे संकट (Identity Crisis):** तरुण स्वतःची वेगळी ओळख निर्माण करण्यासाठी विचलित गटात सामील होतात.
२. **मित्रपरिवाराचा प्रभाव:** ८०% प्रकरणांमध्ये तरुण आपल्या मित्रांच्या दबावामुळे अमली पदार्थांचे सेवन सुरू करतात.
**३. मूल्यहीनता (Anomie):** समाजात नैतिक मूल्यांची घसरण होत असल्याने तरुणांना चुकीचे वागण्यात गैर वाटत नाही.
**४. डिजिटल विचलन:** सायबर गुन्हेगारी ही शिक्षित युवकांमधील एक वाढती उपसंस्कृती बनली आहे.

थोडक्यात सांगायचे तर, विचलनाची उपसंस्कृती ही केवळ वैयक्तिक समस्या नसून ती सामाजिक रचनेतील दोषांचे प्रतिबिंब आहे.

**शिफारशी :**

१. **कौटुंबिक समुपदेशन:** पालकांनी मुलांशी संवाद वाढवून त्यांच्या भावनिक गरजा समजून घेतल्या पाहिजेत.
२. **कौशल्य विकास:** केवळ पदव्या न देता युवकांना रोजगारक्षम बनवण्यासाठी तांत्रिक कौशल्ये देणे आवश्यक आहे.
३. **नैतिक शिक्षण:** शाळा आणि महाविद्यालयांमध्ये मूल्याधिष्ठित शिक्षणावर भर दिला पाहिजे.
४. **सायबर साक्षरता:** सोशल मीडियाच्या धोक्यांबाबत युवकांचे प्रबोधन करणे गरजेचे आहे.
५. **क्रीडा आणि कला:** युवकांच्या ऊर्जेला विधायक वळण देण्यासाठी क्रीडा आणि सांस्कृतिक व्यासपीठे उपलब्ध करून दिली पाहिजेत.

**संदर्भ:**

१. राम अहुजा(२०१४) : भारतीय सामाजिक समस्या, रावत पब्लिकेशन्स,जयपुर
२. खडसे, भा. क. (२०१६) :भारतीय समाजशास्त्र, हिमालय पब्लिशिंग हाऊस
३. आगलावे, प्रदीप(२०२१): समाजशास्त्र संकल्पना आणि सिद्धांत, साईनाथ प्रकाशन,नागपूर.
४. साळुंके, सर्जेराव(२०१०): विचलित वर्तन आणि गुन्हेगारी, डायमंड पब्लिकेशन, पुणे अनुवादक भार्गव, नरेश(२०१९) भारतीय समाजशास्त्र चिंतन, रावत पब्लिकेशन, जयपूर.
५. नागला, बी. के.
६. Merton, Robert K. (1968): Social Theory and Social Structure, New York
७. Cohen, Albert (1955). Delinquent Boys: The Culture of the Gang, The Free Press New York.
८. Haralambos, M (2017): Sociology Themes and Perspectives, Oxford University, New Delhi
९. Sutherland, Edwin (1947): Principles of Criminology, Fourth Edition
१०. UNODC, World Drug Report (2022): New York,
११. Revisesociology.com>subculture theories
१२. Socialjustice.gov.in
१३. Youth in India (2017): Central Statistics Office, Mini. of Statistic &Program Govt. of India